DIGGI MULTITRADE LIMITED
CIN: L65900MH2010PLC210471
Registered Office: D-106, Crystal Plaza, Opp Infiniti Mall,Andheri West, Mumbai 400053
Tel.: 022-26744367; E-mail ID: info@diggimultitrade.com; Website: www.diggimultitrade.com

**To,**
**Bombay Stock Exchange**
**1st Floor, New Trading Ring,**
**Rotunda Building, P. J. Towers,**
**Dalal Street, Fort, Mumbai — 400 001**

**Subject: Submission of Newspaper clipping of publication of Standalone Audited Financial Results for the Quarter and year ended March 31st, 2021.**

**ISIN: INE158R01012**

Dear Sir,

Please find enclosed copies of advertisement published in Mumbai lakshydeep in Marathi newspaper & The Active Times in English newspaper in respect of publication on dated 09th June 2021, of Standalone Audited Financial Results for the Quarter and Year Ended March 31st, 2021.

Thanking You,

**For Diggi Multitrade Limited**

Varun Dhandh
Director
DIN: 06870407

# वुहान लॅबमधूनच पसरला करोना विषाणू, अमेरिकन अहवालात शिक्कामोर्तब




**वुहान, दि. ८, (प्रतिनिधी) :** कोरोनाने जगात हाहाकार केला आहे. दुसऱ्या लाटेत जगात चक्क मृत्यू तांडव सुरु होता. अजुनही संपुर्ण जग कोरोनाचा सामना करत आहे. कोरोनाचा फैलाव सर्वात आधी चीनमध्ये झाला होता. त्यानंतर गेल्या दीड वर्षांपासून कोरोना विषाणूने जगभरात विनाश केला आहे. कोरोनामुळे आतापर्यंत जगभरात कोट्यावधी लोकांना संसर्ग झाला आहे आणि लाखो लोकांना आपला जीव गमवावा लागला आहे. परंतु आतापर्यंत जगाला या प्रश्नाचे उत्तर सापडलेले नाही, कोरोना विषाणूची उत्पत्ति कशी झाली? दरम्यान, जगाला संशय असलेल्या चीनच्या वुहानमधील त्याच प्रयोगशाळेत कोरोना विषाणू बनविला गेला होता, आता अमेरिकन प्रयोगशाळेच्या अहवालानेही यावर शिक्कामोर्तब केला आहे.

अमेरिका सरकार कोरोना विषाणूवर संशोधन करीत आहे. चीनमधील वुहान लॅबमधून कोरोना विषाणूचा फैलाव झाल्याची शक्यता असल्याचा दावा या अहवालात करण्यात आला आहे. अमेरिकन वृत्तपत्र वॉल स्ट्रीट जर्नलच्या अहवालानुसार हा अभ्यास कॅलिफोर्नियामधील लॉरेन्स लिव्हरमोर नॅशनल लॅबोरेटरीने मे २०२० मध्ये सुरू केला होता. डोनाल्ड ट्रम्प यांचा कार्यकाळ संपण्यापूर्वी राज्य विभागाने व्हायरसच्या मूळ स्त्रोताच्या तपासणीचे आदेश दिले होते. लॉरेन्स लिव्हरमोरचे मूल्यांकन कोविड-१९ विषाणूच्या जीनोमिक विश्लेषणावर आधारित आहे.

**चीनवर दबाव कायम ठेऊ**

अमेरिकेचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार जॅक सुलिवान म्हणाले, कोविड -१९ च्या उत्पत्तीविषयी माहिती देण्यासाठी आणि पारदर्शकता कायम ठेवण्यासाठी आंतरराष्ट्रीय समुदायासह चीनवर दबाव कायम ठेऊ. तसेच अमेरिका आपल्या स्तरावर आढावा व प्रक्रिया सुरू ठेवेल. ''आम्ही आंतरराष्ट्रीय समुदायाला सोबत घेऊन चीनवर दबाव कायम ठेऊ. त्यामुळे चीन डेटा व माहिती देत राहिल. जर याबाबत चीनने नकार दिला. तर असे मुळीचं होणार की, आपण फक्त उभे राहून हे पाहत बसू आणि त्यांचे म्हणने स्वीकारू,'' असे जॅक सुलिवान म्हणाले.

# आंतरराष्ट्रीय वेबसाईट्सना जगभरात एरर, ओपनच होईनात 'या' साईट्स...

**नवी दिल्ली, दि. ८, (प्रतिनिधी) :** परदेशी वृत्तसंस्थांच्या तसंच इतरही काही आंतरराष्ट्रीय वेबसाईट्स काही काळ बंद पडल्या आहेत. द न्यूयॉर्क टाईम्स, वॉशिंग्टन पोस्ट, वॉल स्ट्रिट जर्नल या साईट्सवर गेल्यावर तिथे सारखीच एरर दाखवत आहे. या साईट्स ओपन करण्याचा प्रयत्न केल्यास ५०३ ही एरर दाखवत आहेत.

**कोणत्या वेबसाईट्स बंद पडल्या?**

- ब्रिटीश सरकारची जीओव्ही डॉट युके
- गार्डीयन
- फायनॅन्शियल एक्सप्रेस
- इंडिपेंडंट
- न्यू यॉर्क टाइम्स
- रेडिट
- ॲमेझॉन
- सीएनन
- फॅनडम
- हुलूलू
- ट्विचअप
- द वॉशिंग्टन पोस्ट,
- वॉल स्ट्रिट जर्नल
- ट्विटर
- पे पल
- स्पॉटीफाय
- ई बे
- गीट हब
- पीनस्ट्रेस्ट
- स्वेअरस्पेस

यातल्या काही साईट्स हळूहळू ओपन होऊ लागल्या आहेत. मात्र काही साईट्स अजूनही बंदच आहेत. ही एरर कशामुळे आली आहे याबद्दल अद्याप काहीही स्पष्ट झालेलं नाही.

# मे महिन्यात दीड कोटी देशवासी बेरोजगार, ११ महिन्यात बेरोजगारीचं प्रमाण दुप्पट




**दिल्ली, दि. ८, (प्रतिनिधी) :** देशातली कोरोनाची दुसरी लाट आता काहीशी ओसरताना दिसत आहे. दैनंदिन बाधितांची, मृतांची संख्या जरी कमी होत असली तर बेरोजगार होणाऱ्यांची संख्या मात्र सातत्याने वाढत आहे. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर लावण्यात येणाऱ्या लॉकडाउनमुळे देशाची अर्थव्यवस्था ठप्प झाली आहे. तसंच बेरोजगारीच्या प्रमाणातही कमालीची वाढ झाली आहे.

एका खासगी संशोधन संस्थेने याबद्दलचा अभ्यास केला आहे. त्यांच्या या अभ्यासानुसार, या वर्षी मे महिन्यात भारतातल्या जवळपास दीड कोटींहून अधिक लोकांच्या नोकऱ्या गेल्या आहेत. यामुळे देशातल्या बेरोजगारीच्या प्रमाणात कमालीची वाढ झालेली दिसून येत आहे. गेल्या वर्षीच्या एप्रिल महिन्यात देशातलं बेरोजगारीचं प्रमाण ७.९७ टक्के होतं. मात्र या वर्षीच्या मे महिन्यामध्ये हेच प्रमाण ११.९ टक्क्यांवर पोहोचलं आहे.

गेल्या वर्षीच्या तुलनेत ही फार मोठी वाढ आहे. गेल्या वर्षी जूनमध्ये हे प्रमाण १०.१८ टक्के होतं. सेंटर फॉर मॉनिटरिंग इंडियन इकॉनॉमी यांनी दिलेल्या माहितीनुसार, रोजगार असणाऱ्यांपैकी शहरी भागातले जवळपास १४.७३ टक्के तर ग्रामीण भागातले १०.६३ टक्के लोक बेरोजगार झाले आहेत.

गेल्या वर्षीच्या एप्रिलमध्ये कोरोनाच्या पार्श्वभूमीवर लागू करण्यात आलेल्या लॉकडाउनदरम्यान बेरोजगारीचा दर सर्वाधिक म्हणजे २३.५२ टक्के होता. मात्र पुढच्या महिन्यापासून हा दर कमी होऊ लागला. मे २०२० मध्ये देशातला बेरोजगारीचा दर २१.७३ टक्क्यांवर पोहोचला. CMIEने दिलेल्या माहितीनुसार, मे मध्ये ३७.५४५ कोटी लोकांकडे रोजगार आहे, तर एप्रिलमध्ये ३९.०७९ कोटी लोकांना रोजगार मिळाला होता. म्हणजेच मेमध्ये १.५३ कोटीहून अधिक लोकांच्या नोकऱ्या गेल्या आहेत.

# पाकिस्तानात रेल्वेगाड्यांच्या धडकेत ५० जण ठार



**कराची, दि. ८, (प्रतिनिधी) :** पाकिस्तानातील दक्षिणेकडच्या सिंध प्रांतात दोन प्रवासी रेल्वे गाड्यांची सोमवारी सकाळी टक्कर होऊन किमान ५० ठार तर ७० जण जखमी झाले आहेत.

मिल्लत एक्स्प्रेस कराचीहून सारागोधा कडे येत होती, ती विरुद्ध बाजूच्या मार्गावर जाऊन उलटली, त्याचवेळी तिची टक्कर सर सय्यद एक्स्प्रेसशी झाली. ही गाडी रावळपिंडीहून कराचीकडे जात होती, असे पाकिस्तान रेल्वेच्या प्रवक्त्याने सांगितले. लष्कर व निमलष्करी दले मदतकार्य करीत आहेत. या अपघातात मिल्लत एक्स्प्रेसचे डबे धारकी येथे उलटलेले होते, हे ठिकाण सिंधमधील घोटकी जिल्ह्यात आहे.

पंतप्रधान इम्रान खान यांनी म्हटले आहे, की या अपघाताचे वृत्त ऐकून धक्का बसला.

जिओ न्यूजला घोटकी येथील उपआयुक्त उस्मान अब्दुल्ला यांनी सांगितले, की १३ ते १४ डबे घसरलेले असून सहा ते आठ डब्यांचा चुराडा झाला आहे. अनेक लोक अडकून पडले असून त्यांना बाहेर काढणे हे एक आव्हान आहे. घोटकीचे पोलीस अधीक्षक उमर तुफैल यांनी सांगितले, की काही डब्यात प्रवासी अडकले असून मृतांची संख्या वाढण्याची शक्यता आहे. काही जणांनी ढिगाऱ्यातून बाहेर काढत असताना प्राण सोडले. दोन्ही गाड्यांमध्ये मिळून एकूण १००० प्रवासी होते. वीस प्रवासी अजून अडकलेले असून दोन्ही रेल्वेतील प्रवाशांची माहिती घेण्यात येत आहे.

# करोनावरील उपचारांसाठी इव्हर्मेक्टिन, डॉक्सिसाईक्लिन औषधांचा वापर थांबवा; आरोग्य मंत्रालयाची सूचना



**दिल्ली, दि. ८, (प्रतिनिधी) :** केंद्रीय आरोग्य मंत्रालयाच्या आरोग्य सेवा महासंचालनालयाने (डीजीएचएस) कोविड व्यवस्थापन मार्गदर्शक तत्त्वांमध्ये बदल करण्यात आले आहेत. सुधारित नियमावलीनुसार सौम्य लक्षणे असलेल्या रुग्णासांठी वापरण्यात येणाऱ्या अँटीपायरेटीक आणि ॲन्टी-ट्युसिव्ह वगळता कोणतीही औषधे वापरण्याची सूचना करण्यात आली आहे.

खोकला आणि ताप कमी करण्यासाठी या औषधांचा वापर करण्यात येतो. दरम्यान, मंत्रालयाने वैद्यकीय अधिकऱ्यांना औषधे वापरताना अत्यंत सावधगिरी बाळगण्यास सांगितले आहे.

करोना रुग्णसंख्येमध्ये लक्षणीय घट दिसत असताना हा निर्णय घेण्यात आला आहे. २७ मे रोजी जारी केलेल्या सुधारित मार्गदर्शक सूचनांमध्ये डॉक्टरांनी सौम्य लक्षणांसाठी वापरण्यात येणाऱ्या हायड्रोक्सीक्लोरोक्विन, इव्हर्मेक्टिन, डॉक्सीसाइक्लिन, जस्त, मल्टीव्हिटॅमिन इत्यादी सर्व औषधे वापरण्यास मनाई केली आहे. तसेच या मार्गदर्शक तत्वांमध्ये विनाकारण सीटी स्कॅनसारख्या अनावश्यक चाचण्या लिहून न देण्यास सांगितले आहे.

**आरोग्य मंत्रालयाने जारी केलेली मार्गदर्शक तत्त्वे**

कोविड -१९ पासून संरक्षणासाठी योग्य मास्क, हातांची स्वच्छता आणि योग्य शारीरिक अंतर यांसारख्या गोष्टींवर भर देण्यास सांगितले आहे. मार्गदर्शक तत्त्वांनुसार, ज्या लोकांमध्ये कोविडची लक्षणे आढळली आहेत त्यांना डॉक्टरांच्या मार्गदर्शनासह निरोगी संतुलित आहार घेण्याचा सल्ला देण्यात आला आहे. रूग्ण आणि त्याच्या कुटुंबियांनी संपर्कात रहाण्यासाठी आणि फोन, व्हिडीओ-कॉल इत्यादी माध्यमातून सकारात्मक संवाद साधायला हवा असे सांगण्यात आलं आहे. लक्षणे नसलेल्या रुग्णांवर आवश्यक असल्यावरच औषधे देण्यात यावी असे मार्गदर्शक सूचनांमध्ये सांगण्यात आलं आहे. सौम्य लक्षणे असणाऱ्या रुग्णांमध्ये ताप येण्यासारख्या लक्षणांवर देखरेख करण्याची शिफारस मार्गदर्शक सूचनांमध्ये केली आहे.

दरम्यान याआधी जागतिक आरोग्य संघटनेच्या वैज्ञानिकांनी कोरोना बाधित रुग्णांवर उपचारासाठी इव्हर्मेक्टिन या औषधाचा वापर न करण्याचा सल्ला दिला होता. जागतिक आरोग्य संघटनेच्या वैज्ञानिक डॉ. सौम्या स्वामीनाथन यांनी ट्विट करत हे औषध न वापरण्याचा इशारा दिला होता. गोवा राज्यात सोमवारी १८ वर्षावरील सर्वांना हे औषध देण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्यानंतर डॉ. सौम्या स्वामीनाथन यांनी ही माहिती दिली होती.

**काय आहे इव्हर्मेक्टिन?**

इव्हर्मेक्टिनला अन्न आणि औषध प्रशासनाने (एफडीए) मान्यता दिली आहे. हे मलेरियासारख्या आजारांच्या उपचारांसाठी दिले जाणारे औषध म्हणून वापरले जाते. बहुतेकवेळा आतड्यांसंबंधी स्ट्रॉन्डोलायडायसिस आणि ऑन्कोसरिसियासिस विकार असलेल्या असलेल्या रूग्णांसाठी देखील हे वापरले जाते. कोरोनावरील उपचारांसाठी अजून पर्यंत तरी इव्हर्मेक्टिनला मान्यता मिळाली नसली तरी जगाच्या विविध भागांमध्ये याचा वापर केल्याने रुग्णांवर हे औषध परिणामकारक ठरले आहे.

# "...तर ब्लॅक फंगसवरील उपचारांचा खर्च ३५ हजारांवरून ३५० रुपयांवर येईल"

**दिल्ली, दि. ८, (प्रतिनिधी) :** देशात गेल्या काही दिवसात करोनाचा जोर ओसरत असल्याचं दिसत आहे. मात्र असं असलं तरी म्युकरमायकोसिस अर्थात ब्लॅक फंगस या आजाराने डोकं वर काढलं आहे. या आजारावर होणारा खर्च पाहता अनेकांना धडकी भरते. त्यामुळे अनेकांना उपचाराचा खर्च परवडत नसल्याने जीवाला मुकावं लागत आहे. अँटी फंगल इंजेक्शनची किंमत पाहून अनेकांच्या पायाखालची वाळू सरकते.

असं असताना आता ब्लॅक फंगस झालेल्या रुग्णांना दिलासा देणारी बातमी समोर आली आहे. ब्लॅक फंगसवरील उपचारांचा खर्च १०० पटीने कमी करण्याचं एक सूत्र समोर आलं आहे. सध्या ब्लॅक फंगस झालेल्या व्यक्तीला दिवसाला जवळपास ३५ हजार रुपये खर्च होतो. म्हणजेच हा खर्च दिवसाला ३५० रुपयांपर्यंत आणण्याचं गणित बांधलं गेलं आहे. अनेकांना प्रश्न पडला हे गणित कसं शक्य आहे. रुग्णाच्या रक्तातील क्रिएटिनिन पातळी तपासणी केल्यास हा खर्च कमी होऊ शकतो. दर दोन दिवसांनी रुग्णांची रक्त चाचणी करून त्यावर उपचार केले जाऊ शकतात, असं तज्ज्ञांनी सांगितलं आहे.

रक्तातील क्रिएटिनिनची पातळी वाढली तर ठराविक अंतराने किंवा कमी कालावधीत औषध दिलं जाऊ शकतं. त्यामुळे शरीराचं संतुलन राखण्यास मदत होते. रक्तातील क्रिएटिनिन हे मूत्रपिंडाद्वारे तयार केलेला कचरा असतो आणि तो शरीरात जास्त प्रमाणात जमा झाल्यास धोकादायक ठरू शकतं. त्यामुळे दर दोन दिवसांनी रक्तातील क्रिएटिनिनची चाचणी केल्यास उपचारात मदत होऊ शकते, असं तज्ज्ञांनी सांगितलं आहे.

ब्लॅक फंगसच्या उपचारात एम्फोटेरेसिन इंजेक्शनचा वापर केला जातो. मात्र सध्याच्या स्थितीत या इंजेक्शनचा तुटवडा जाणवत आहे. इंजेक्शनची किंमत अधिक आणि उपलब्धता नसल्याने रुग्णांचे हाल होत आहे. त्यामुळे याच औषधाचा दुसरा पर्याय शोधणं आवश्यक आहे. त्यामुळे उपचारांचा खर्च १०० पटीने कमी होईल अशी उपचार पद्धती लागू करणं गरजेचं ठरेल. त्यामुळे त्याला लिपोसोमल एम्फोटेरेसिन पर्याय ठरू शकेल. या दोन्ही औषधांचा प्रभाव सारखाच असल्याचं तज्ज्ञांचं म्हणणं आहे. मात्र यासाठी डॉक्टरांनी रुग्णांच्या रक्तातील क्रिएटीनिन पातळी तपासणे गरजेचं आहे. २१ दिवसानंतर रक्तातील क्रिएटिनिन पातळी वाढली तर उपचारांची मात्रा बंद केली पाहीजे, असंही तज्ज्ञांनी सांगितलं आहे.

दरम्यान गेल्या काही दिवसात ब्लॅक फंगसची वाढतं प्रकरणं पाहता दिल्ली हायकोर्टानं चिंता व्यक्त केली होती. तसेच एम्फोटेरेसिन इंजेक्शनच्या तुटवडा पाहता ब्लॅक फंगसवर उपचारांसाठी लिपोसोमल एम्फाटेरिसिन बी औषध वितरणाबाबत धोरण आखण्यास सांगितलं होतं.

# सात किलोमीटरचा पायी प्रवास पाण्याविनाच; पाच वर्षांच्या मुलीचा तहानेने मृत्यू



**दिल्ली, दि. ८, (प्रतिनिधी) :** राजस्थानमध्ये पाच वर्षांची एक लहान मुलगी आपल्या आजीसोबत नातेवाईकांच्या घरी चालत निघाली होती. मात्र, रणरणतं ऊन, कच्चा रस्ता आणि पाण्याचा एक थेंबही न मिळाल्यानं या चिमुकलीचा जीव गेला. तिच्या आजीलाही हे ऊन सहन झालं नाही त्यामुळे तिही बेशुद्ध पडली. तिला दवाखान्यात दाखल करण्यात आलं आहे.

राजस्थानमधल्या जालोर जिल्ह्यातल्या रानीवाडा भागातली ही घटना आहे. एक वृद्ध महिला आपल्या पाच वर्षांच्या नातीसोबत आपल्या नातेवाईकांकडे जायचं म्हणून पायी निघाली होती. जवळपास १२ किलोमीटरचा रस्ता होता. मात्र, टळटळीत दुपार, प्रखर ऊन आणि कच्च्या रस्त्यावर पाण्याचा एक थेंबही न मिळाल्याने या पाच वर्षांच्या मुलीचा दुर्दैवी मृत्यू झाला. या वयस्क महिलेलाही उन्हाचा त्रास झाल्याने तीही बेशुद्ध अवस्थेत आहे.

ह्या दोघींना असं तापलेल्या जमिनीवर पडलेलं पाहून शेजारुन जाणाऱ्या एका युवकाने गावच्या सरपंचांना फोन केला. सरपंच पोलिसांसह घटनास्थळी पोहोचले आणि या वृद्धेला रुग्णालयात दाखल करण्यात आलं. चौकशीत हे समोर आलं की सिरोहीमधल्या रायपूर गावातून ह्या दोघी निघाल्या होत्या. त्या सलग नऊ तास चालत होत्या, त्यांनी सात किलोमीटरचं अंतर पार केलं होतं. मात्र उन्हाचा तडाखा या दोघींनाही सहन झाला नाही आणि त्या चिमुरडीने प्राण सोडले. या महिलेला शुद्ध आल्यावर तिने सांगितलं की, तहानेमुळे दोघीही बेशुद्ध झालो होतो. पण काही वेळाने हलक्या पावसाला सुरुवात झाली आणि त्यामुळे माझा जीव वाचला. लॉकडाउनमुळे सध्या येण्याजाण्याची कोणतीही सोय नसल्याने रायपूर ते डुंगरी हा २२ किलोमीटरचा प्रवास करण्याऐवजी या महिलेने १५ किलोमीटरचा शॉर्टकट निवडला होता. सकाळी ८ वाजता या दोघींनी चालायला सुरुवात केली. तेव्हा वातावरण थंड होतं, मात्र दुपारपर्यंत पारा ४५ अंशांवर पोहोचला होता.

# मुंबई- कोलकाता विमानातील ८ प्रवासी जखमी

**कोलकाता, दि. ८, (प्रतिनिधी) :** विस्तारा एअरलाइन्सचे मुंबई- कोलकाता विमान उतरण्याच्या बेतात असतानाच खराब वातावरणाने विमान प्रभावित होऊन ८ प्रवासी जखमी झाले.यूके ७७५ हे विमान दुपारी ४.२५ वाजता कोलकाता विमानतळावर सुरक्षितरीत्या उतरले, असे विमानतळ संचालक सी. पट्टाभि यांनी सांगितले. 'टर्ब्युलन्स'मुळे विमानातील ३ प्रवासी गंभीर जखमी झाले, तर पाच प्रवाशांना किरकोळ जखमा झाल्या, अशीही माहिती त्यांनी दिली. गंभीर जखमी प्रवाशांना उपचारांसाठी खासगी रुग्णालयात पाठवण्यात आले, तर किरकोळ जखमी प्रवाशांवर प्रथमोपचार केल्यानंतर त्यांना गंतव्य स्थळी रवाना करण्यात आले. विमानात १२३ प्रवासी होते. हे विमान कोलकात्यापासून २५ नॉटिकल मैल अंतरावर असताना दुपारी ४ वाजताच्या सुमारास खराब वातावरणामुळे ही घटना घडली, असेही पट्टाभि म्हणाले. प्रवाशांना आलेल्या दुर्दैवी अनुभवाबद्दल आम्ही दुःखी आहोत. या घटनेचा आम्ही प्राधान्याने तपास करत आहोत, असे विस्ताराच्या प्रवक्त्याने सांगितले.

**हरवले व सापडले**

येथे सुचित करण्यात येत आहे की, साई फायनानशियल ॲण्ड बीपीओ सोल्युशन्सद्वारे वितरीत एसबीआय कार्डकरिता कंत्राटदाराचे माझे मुळ ओळखपत्र हरवले / गहाळ झाले आहे.
कर्मचाऱ्याचे नावः प्रणय पांगेरकर
आयडी कार्ड क्रमांक : ३३७९९३
समाप्ती तारीख : १०.०७.२०२१
पुर्ण पत्ता : १०४, १ला मजला, शिवकृपा कमर्शियल सेन्टर, गोखले रोड, नौपाडा, ठाणे (प) - ४००६०२

**PUBLIC NOTICE**

Notice is hereby given to public at large that my client Mr. Rajesh Pranlal Meswani & Mr. Pranlal Varjivandas Meswani (since deceased) were the co-owners of Flat No.D/302 admeasuring 530 sq. ft. Built-up area on 3rd Floor in the building known as Panchratna Co-op. Hsg. Soc. Ltd., situated at Plot No.5, Mulji Nagar, S. V. Road, Borivali (West), Mumbai 400 092 along with five fully paid up shares of Rs.50/- each bearing distinctive Nos. 361 to 365 (both inclusive) under Share Certificate No.73. The 50% undivided rights of Mr. Pranlal Varjivandas Meswani in the said Flat and the said Shares have been transferred in the name his daughter in law Mrs. Mansi Rajesh Meswani after Mr. Pranlal Varjivandas Meswani expired on 04/07/2010. All persons who have any claim, right, title and/or interest or demands to in or against the said property by way of inheritance, sale, mortgage, charge, trust, lien, possession, gift, maintenance, lease, attachment or otherwise howsoever is hereby required to make the same known in writing to the undersigned at her address at Shop No.14, Akruti Apartment, Mathuradas Road, Kandivali (West), Mumbai 400 067 and also to the abovementioned society within 15 days from the date hereof, otherwise if any claim comes forward hereafter will be considered as waived and/or abandoned.

Sd/-
(Rashida Y. Laxmidhar)
Advocate

# ६० हजार लिटरहून अधिक ज्वलनशील ॲसिड कंपन्यांनी नैसर्गिक स्रोतांमध्ये सोडलं



**दिल्ली, दि. ८, (प्रतिनिधी) :** सगळ्यात घातक असं हायड्रोक्लोरिक ॲसिड रहिवासी भागात सोडण्याचा प्रकार केल्याचा आरोप दोन खासगी कंपन्यांवर केला जात आहे. अहमदाबादमध्ये ही घटना घडली आहे. या दोन कंपन्यांनी ६० हजार लीटरहून अधिक हायड्रोक्लोरिक ॲसिड, त्याच्यावर कोणतीही प्रक्रिया न करता रहिवासी भागात सोडण्याचा प्रयत्न केला आहे.

प्रदुषण नियंत्रण मंडळाला तपास करत असताना यासंदर्भातली माहिती मिळाली. गांधीनगरमधल्या कलोल शहरातल्या मेहसाना अहमदाबाद महामार्गावरच्या जनपथ पेट्रोलपंपाजवळ अधिकाऱ्यांना दोन टँकर्स संशयास्पद रितीने आढळले. ३१ मेच्या रात्री ही घटना उघड झाली.

अधिकाऱ्यांनी या टँकर्समधल्या पदार्थाची चाचणी केली. त्यावेळी त्यांच्या लक्षात आलं की यामध्ये तब्बल ६० हजार लीटर्स इतकं कोणतीही उत्सर्जन प्रक्रिया न केलेलं हायड्रोक्लोरिक ॲसिड आहे. दोन्ही टँकर्सच्या चालकांना ताब्यात घेतल्यानंतर त्यांच्याकडून माहिती मिळाली की हे टँकर्स एशियन ट्यूब लिमिटेड या कंपनीच्या कारखान्यामधून आलेले आहेत. हे ॲसिड वाटवा किंवा ओधव या भागातल्या तलावांमध्ये, गटारांमध्ये किंवा रिकाम्या जागेत सोडलं जात होतं.

या प्रकरणातल्या तज्ञांच्या म्हणण्यानुसार, अशा प्रकारे उत्सर्जन प्रक्रिया न केलेलं ॲसिड रहिवासी भागात सोडल्याने प्राण्यांना तसंच परिसरातल्या लोकांनाही गंभीर परिणाम भोगावे लागू शकतात. या चालकांनी सांगितलं की, एशियन ट्यूब कंपनीच्या मॅनेजरने या टँकर्सचा मालक जक्षी भरवाड याला वाटवा भागात हे टँकर्स घेऊन जायची सोय करण्यास सांगितलं. हे प्रकरण उघडकीस आल्यानंतर पोलिसांनी या कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक बजरंग लाल अगरवाल आणि संचालक आदित्य अगरवाल, तसंच मॅनेजर बिपीन सुथार, त्याचबरोबर टँकरचा मालक जक्षी भरवाड आणि दोन्हीही चालकांना ताब्यात घेतलं आहे.

**SUBWAY FINANCE & INVESTMENT COMPANY LIMITED**
CIN: L65990MH1983PLC029350
B-101, Eastern Court, Jn. of Tejpal & Parleshwar Road, Vile Parle (E), Mumbai- 400057. Tel: 022-26165960 (8 Lines) Fax: 022-26165969
Email: subwayfinance.co@gmail.com, Website: www.subwayfinance.co.in

**NOTICE**

NOTICE is hereby given that pursuant to Regulation 29 read with Regulation 47 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015, a Meeting of the Board of Directors of the Company will be held on 21st June, 2021, inter alia, consider and take on records the Unaudited Financial Statements with Limited Review Report of the Company for the Quarter and Year ended 31st March 2021.

This intimation is also available on the website of the Company and on the BSE Limited, (www.bseindia.com) where the Company's shares are listed.

For and on behalf of
**SUBWAY FINANCE AND INVESTMENT COMPANY LIMITED**
Sd/-
**ISHAN SHAH** (MANAGING DIRECTOR) (DIN: 06966381)

# नशेच्या धुंदीत नवरा लग्नमंडपात पोहोचला अन्...

**दिल्ली, दि. ८, (प्रतिनिधी) :** लग्न म्हटलं रुढी पंरपरा आणि त्यात अनेकांचे रुसवेफुगवे आलेच. मात्र या सर्वांकडे दुर्लक्ष करून लग्नसोहळा पार पाडला जातो. सध्या कोरोनाचं संकट असल्याने वऱ्हाडी मंडळींच्या संख्येवरही मर्यादा आली आहे. त्यामुळे अनेक जण थोड्याथोडक्यात लग्नसोहळे पार पाडत आहेत. उत्तर प्रदेशातील प्रयागराजमध्ये अशाच एका विवाहसोहळ्याचं आयोजन करण्यात आलं होतं. मात्र नवरा मुलगा आणि त्याच्या मित्रांना लग्नमंडपात दारूच्या नशेत पाहिल्यानंतर नवऱ्या मुलीला संताप झाला.

२२ वर्षीय वधूने एका क्षणाचाही विलंब न करता लग्न करण्यास नकार दिला. त्यानंतर मुलीच्या कुटुंबियांनी नवरा आणि वऱ्हाडी मंडळींना बंदीस्त केलं आणि लग्नासाठी दिलेल्या वस्त परत मागितल्या. कुटुंबियांचं आक्रमक रुप पाहून नवऱ्याकडील मंडळींनी पोलिसांना बोलवलं आणि मध्यस्थी करण्याची मागणी केली.

प्रयागराजमधील प्रतापगढ शहरातील टिकरी गावात लग्नाचं आयोजन करण्यात आलं होतं. टिकरी गावातील शेतकऱ्याने आपल्या मुलीचं लग्न रविंद्र पटेल या व्यक्तीशी करण्याचं ठरवलं होतं. त्यानुसार दोन्ही बाजूच्या मंडळींनी बोलणी केली आणि दोघांकडून होकार आल्यानंतर लग्नाची तारीख ठरवण्यात आली. चौकशीत मुलगा व्यवस्थित असल्याचं त्यांना सांगण्यात आलं होतं. मात्र ऐन लग्नाच्या दिवशी नवरा मुलगा आणि त्याचे मित्र दारुच्या नशेत लग्न मंडपात आले. हा प्रकार पाहिल्यानंतर मुलीला संताप झाला. नवरा आणि त्याचे मित्र इतक्यावरच थांबले नाही तर लग्न मंडपात त्यांनी गोंधळही घातला. मात्र ठरलेलं लग्न मोडणार कसं असा प्रश्न वधू आणि तिच्या कुटुंबियांना पडला होता. त्यामुळे ते त्यांच्याकडे दुर्लक्ष करत होते. अखेर संयमाचा बांध फुटला. वरमाला समारोहावेळी नवऱ्याने नवरीला नाचण्याचा आग्रह केला. मुलीने त्याला नकार दिल्याने नवरा मुलगा नाराज झाला. दारुच्या नशेत असल्याने त्याने आणखी गोंधळ घालण्यास सुरुवात केली. याबाबतचं वृत्त इंडिया टुडेनं दिलं आहे.

नवऱ्या मुलाचं वागणं बघून मुलीने लग्न करण्यास नकार दिला. त्यानंतर आधीच संताप झाल्याने नवरीच्या कुटुंबियांना नवरा मुलगा आणि त्याच्या नातेवाईकांना बंदीस्त केलं. त्यानंतर पोलीस घटनास्थळी पोहोचले आणि प्रकरण शांत झालं. नवऱ्याच्या कुटुंबियांनी वधुच्या कुटुंबियांना रोख रक्कम आणि अन्य वस्तू पुन्हा परत करण्यास सहमती दर्शवली आहे.

# मोबाईल सर्व्हिस सेंटरमधून विद्यार्थिनीचे नग्न फोटो शेअर केल्याचं प्रकरण; ॲपलला मोजावे लागले कोट्यवधी डॉलर्स!

**वॉशिंगटन, दि. ८, (प्रतिनिधी) :** तंत्रज्ञानाच्या युगात प्रत्येकाच्या हातात मोबाईल पाहायला मिळतो. या फोनमध्ये अनेक आठवणींचा साठा असतो. फोटो, व्हिडीओ यांचा संग्रह केलेला असतो. मात्र काही गोपनीय गोष्टींही दडवलेल्या असतात. हा गोष्टी कुणाच्या हाताला लागू नये यासाठी पासवर्ड ठेवला जातो. त्यामुळे तशा गोष्टी बाळगणाऱ्या व्यक्तीला भीती कमी असते. मात्र फोन खराब झाला आणि हा फोन दुरुस्त करणाऱ्या व्यक्तीच्या हाती लागला, तर सर्वच गोष्टी उघड होतील.

अशीच एक घटना अमेरिकेतील कॅलिफॉर्निया येथे घडली. एका विद्यार्थिनींने ॲपल कंपनीचा फोन तांत्रिक दुरुस्तीसाठी सर्व्हिस सेंटरमध्ये दिला होता. मात्र फोन दुरुस्त करणाऱ्या टेक्निशिअनने त्यातील गोपनीय फोटो आणि व्हिडीओ सोशल मीडियावर शेअर केले. त्यामुळे तिला मित्र आणि नातेवाईकांचे फोन येऊ लागल्याने काही कळलंच नाही. अखेर दोन टेक्निशिअनने हे कृत्य केल्याचं तिच्या लक्षात आलं आणि या विरोधात दावा ठोकला.

ही घटना २०१६ रोजी घडली होती. टेक्निशिअनने गोपनीयतेचं उल्लंघन करत १० नग्न फोटो आणि एक व्हिडीओ तिच्या फेसबुक खात्यावरून शेअर केला होता. हे फोटो आणि व्हिडिओ तिने स्वतः शेअर केल्याचं भासवण्यात आलं होतं. मात्र मित्र आणि नातेवाईकांनी याबाबत सांगितल्यावर तिने तात्काळ फोटो आणि व्हिडीओ डिलीट केले. त्यानंतर तिने अब्रुनुकसानीचा दावा ठोकला. कंपनीने याची दखल घेत दोन कर्मचाऱ्यांना कामावरून निष्कासित केलं. या प्रकरणाचा निकाल लागला असून यावर तोडगा म्हणून कंपनीला अब्रुनुकसानीसाठी भरपाई देण्यास सांगितली आहे. तोडग्यासाठी दोन्ही पक्षांनी सहमती दर्शवली आहे.

अब्रनुकसानीच्या तोडग्यासाठीची रक्कम अजून कळू शकलेली नाही. तोडगा हा गोपनीयतेच्या आधारावर केला आहे. कंपनी आणि व्यक्तीची बदनामी टाळण्यासाठी असं करण्यात आलं आहे. यानुसार व्यक्तीला खटल्याची चर्चा आणि भरपाईची रक्कम सांगण्यास मनाई करण्यात आली आहे. मात्र या तोडग्यासाठी कोट्यवधी डॉलर्सची मागणी केल्याचं बोललं जात आहे. वकीलाने या खटल्यासाठी ५ मिलियन डॉलर्सची मागणी केल्याचं द टेलिग्राफने वत्तात सांगितलं आहे.

**PUBLIC NOTICE**

NOTICE is hereby given that Shri. MULRAJ PITAMBER MODY, Shri. HEMANT MANHARLAL SHAH And Shri. SAGAR MULRAJ MODY Partners of M/s TRUTECH ABRASIVE LLP "THE ASSIGNORS" has agreed to transfer the lease of the said Commercial property located at Plot No. A-258 in TTC Industrial Area of MIDC within the village of Mahape and within the limit of Navi Mumbai Muncipal Corporation, Taluka and Registration Sub-District and District : Thane, containing by admeasurement 800 sq.meter together with constructed structure admeasuring 782.86 sq.meters built up area free from all encumbrances.
Any person having any right, title, interest, claim or demand of any nature whatsoever in respect of the said Commercial Property, is hereby required to make the same known in writing along with the documentary proof thereof, to the undersigned at Qadri & Associates (Advocate & Legal Advisors for "M/s SUDHIR DAIRY AND SWEETS PVT LTD"- "THE ASSIGNEES") located at 265, S.V.P Road, Karim Mansion, Shop No.1, Mezanine Floor, Opp. Khoja Kabrastan, Mumbai – 400 009 (Timing 12.00pm – 8.00 pm) (Cell No. 7448259587) within Fifteen days from the date of this publication hereof, failing which the negotiations shall be completed, without any reference to such claims and the claims if any, shall be deemed to have been given up or waived.

**Advocate Aasiemul Qadri**
**For QADRI & ASSOCIATES**

**दिग्गी मल्टीट्रेड लिमिटेड**
**सीआयएन:**एल६५९००एमएच२०१०पीएलसी२१०४७१
**नोंद.कार्यालय:** डी-१०६, क्रिस्टल प्लाझा, इन्फिनीटी मॉल समोर, अंधेरी (पश्चिम), मुंबई-४०००५३.
**ई-मेल:**info@diggimultitrade.com, **वेबसाईट:**www.diggimultitrade.com

**३१ मार्च, २०२१ रोजी संपलेल्या अर्धवर्ष व वर्षाकरिता लेखापरिक्षित वित्तीय निष्कर्षाचा अहवाल**

(रक्कम रु.)

| तपशील | संपलेले अर्धवर्ष ३१.०३.२०२१ लेखापरिक्षित | संपलेले अर्धवर्ष ३१.०३.२०२० लेखापरिक्षित | संपलेले वर्ष ३१.०३.२०२१ लेखापरिक्षित |
|---|---|---|---|
| कार्यचलनातून एकूण उत्पन्न | १५२१००६ | २४७८६४६ | २९४२७९० |
| कर व अपवादात्मक बाबपुर्व निव्वळ नफा/(तोटा) | २९१०४१ | ८९६९९६ | ५१३२१५ |
| करपुर्व निव्वळ नफा/(तोटा) (अपवादात्मक बाबनंतर) | २९१०४१ | ८९६९९६ | ५१३२१५ |
| करानंतर निव्वळ नफा/(तोटा) (अपवादात्मक बाबनंतर) | ३२४१५८ | १०९८६९२ | ४९५०८५ |
| एकूण सर्वंकष उत्पन्न | ३२४१५८ | १०९८६९२ | ४९५०८५ |
| भरणा केलेले समभाग भांडवल | ९६७७५००० | ९६७७५००० | ९६७७५००० |
| उत्पन्न प्रतिभाग | | | |
| मुळ | ०.०५१ | -०.०२५ | ०.०५१ |
| सौमिकृत | ०.०५१ | -०.०२५ | ०.०५१ |

**टिप:** वरील निष्कर्ष हे सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स ॲण्ड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन २०१५ च्या नियम ३३ अन्वये स्टॉक एक्सचेंजसह सादर करण्यात आलेली अर्धवर्ष व वर्षाकरिता लेखापरिक्षित वित्तीय निष्कर्षाचे सविस्तर नमुन्यातील उतारा आहे.

दिग्गी मल्टीट्रेड लिमिटेडकरिता
सही/-
श्री. वरुण धांध
सीएफओ व संचालक
डीआयएन:०६८७०४०७

ठिकाण: मुंबई
दिनांक: ०७.०६.२०२१

# Case Against Opposition Leaders In Punjab For Protests Amid Covid Restrictions

***Punjab Chief Minister Amarinder Singh asked the police chief to act against opposition leaders and workers who have been staging sit-ins in the state over the past few days.***



**Chandigarh:** Several opposition leaders in Punjab, including Sukhbir Singh Badal of the Shiromani Akali Dal and Saravjit Kaur Manuke of the Aam Aadmi Party (AAP), were booked on Monday for staging protests against the state government in violation of the restrictions imposed to curb coronavirus spread, hours after Chief Minister Amarinder Singh directed the police to act against them, officials said.

The chief minister asked the state police chief to act against opposition leaders and workers who have been staging sit-ins in the state over the past few days.

Acting on the chief minister's directions, the police booked a host of opposition leaders under relevant sections of the Indian Penal Code (IPC) and the Disaster Management Act, officials said.

Shiromani Akali Dal (SAD) workers and leaders led by Mr Badal staged a sit-in near the residence of Punjab Health Minister Balbir Singh Sidhu in Mohali on Monday and sought his dismissal from the cabinet over the "diversion" of coronavirus vaccine to private hospitals. The Aam Aadmi Party (AAP) had staged a protest outside Mr Sidhu's residence on Sunday on the same issue.

For the SAD protest, besides Badal, former MP Prem Singh Chandumajra, MLAs Sharanjit Singh Dhillon, NK Sharma, Pawan Kumar Tinu, Sukhwinder Singh, Baldev Singh, Gurpartap Singh Wadala, other senior leaders and around 200 unidentified persons were booked.AAP legislators Saravjit Kaur Manuke, Amarjeet Singh Sandoa, Jai Kishan Rodi and other leaders and 150 unidentified persons were booked for Sunday's protest. The cases were registered in Mohali.The chief minister said the acts of the SAD and the AAP were "irresponsible" and in utter violation of the strict curbs in place in the state in view of the COVID-19 pandemic. He asked Director General of Police (DGP) Dinkar Gupta to take action against them under the law.

At a time when people could not gather even for weddings and funerals, leaders and workers of these parties were behaving in a "reckless manner", showing no concern for the safety and health of the people of Punjab, said the chief minister, adding that such behaviour could not be allowed or tolerated.Pointing out that the AAP's dharna on Sunday was in fact in violation of the weekend curfew in place in the state, the chief minister said such dharnas and political gatherings were potential super-spreaders and had to be firmly tackled.The law should take its course, he told the DGP, adding that political leaders had a big responsibility towards the society, which these parties had "shunned", thus "jeopardising" the lives of Punjab's people.This was not the time to play political games and indulge in dirty politicking but to come together to fight the pandemic to the finish, Mr Singh stated.The Punjab government had last week asked private hospitals to return all vaccine stock meant for the 18-44 age group, following criticism.

Read Daily Active Times

## SUBWAY FINANCE & INVESTMENT COMPANY LIMITED

CIN: L65990MH1983PLC029350
B-101, Eastern Court, Jn. of Tejpal & Parleshwar Road, Vile Parle (E), Mumbai- 400057. Tel: 022-26165960 (8 Lines) Fax: 022-26165969
Email: subwayfinance.co@gmail.com, Website: www.subwayfinance.co.in

**NOTICE**

